**नियमीत फौजदारी खटला क्रमांक - २७/२०२५**
**महा. शासन वि. अनिकेत शिंदे**
**निशाणी क्रमांक- १४/सी**

**(शासनातर्फे साक्षीदार क्रमांक - १ ची जबानी)**
**मी देवाशपथ खरे सांगतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | मारुती शंकर शिंदे |
| वय | - | ६१ वर्षे |
| व्यवसाय | - | शेती |
| पत्ता | - | कसबा वाळवे, ता : राधानगरी, जि : कोल्हापूर |

**सरतपास सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. बी. कांबळे यांचे मार्फत -**

**१.** माझ्या शेतीस मी कॅनोलचे पाणी वापरतो. त्या करीता मी दि.१४/०२/२०२४ रोजी लक्ष्मी कंपनीची ३ एच.पी.ची मोटर पंप माझ्या शेताजवळील कॅनोलवर नुसतीच ठेवली होती. दि.०९/०३/२०२४ रोजी मी व माझा मुलगा तानाजी याने सिमेंट विटचे बांधकाम करुन सदरील मोटर बसवली. दुसरे दिवशी सकाळी ९-९.३० चे सुमारास मी विज आली असल्यामुळे मोटरीजवळ गेलो. सदरील वेळी माझी मोटर जागेवर दिसून आली नाही. आजुबाजूला पाहिले असता भागीरथी भुगटे, विलास कोकाटे, रघुनाथ पाटील व इतर दोन कोकाटे यांचे देखील मोटर जागेवर दिसून आले नाही. मी त्यांना फोन करुन बोलावुन घेतले.

**२.** दि. १२/०३/२०२४ रोजी आम्ही पोलीस ठाणेत आमची मोटर चोरीला गेलेची तक्रार दिली. आता मला  माझा फिर्यादी जबाब दाखविण्यात आला. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.P15/PW1** देणेत येते. आता मला ऑनलाईन प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही असुन

त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.P16/PW1** देणेत येते.

३. दि.१४/०३/२०२४ रोजी पोलीसांनी घटनास्थळी येवुन पंचनामा केला. सुमारे पंधरा दिवसांनी मला पोलीसांचा फोन आला व त्यांनी आरोपी आणि चोरीला गेलेल्या मोटर सापडल्याचे कळविले व आम्हाला कोल्हापूर येथे बोलावुन घेतले. आम्ही कोल्हापूर येथे गेलो. त्यांनी आम्हाला मोटर राधानगरी पोलीस ठाणे येथे पाठवतो असे सांगितले. तेथे आम्हाला आरोपी दाखविले नाहीत. आम्हाला राधानगरी पोलीस ठाणेकडून आमच्या चोरीला गेलेल्या मोटर परत मिळाल्या. माझी मोटर आजरोजी माझेकडे आहे. मला आरोपींची नावे कळवली नाहीत.

४. पोलीसांनी मोटर परत मिळाले नंतर माझे तपास टिपण नोंदविले आहे. मी पोलीसांना सदरील टिपनात आरोपींकडून मोटर सापडल्या असे सांगितले होते.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे श्री. यु. एम. मानकर वकील यांचेमार्फत सुरू -**

५. माझे इयत्ता ४ थी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला लिहीता-वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, सदरील मोटर चोरीला जाणेचे २०-२५ दिवसांपुर्वी माझी आणखी एक मोटर चोरीला गेली होती. त्याची फिर्याद मी राधानगरी पोलीस ठाणेत दिली होती. सदरील गुन्हयातील आरोपी आणि मोटर मिळाली नाही.

६. या कामातील गुन्हयाचे संदर्भात मला जुना राजवाडा पोलीस ठाणे येथे बोलावले होते. सदरील वेळी माझे समक्ष भंगारवाला किंवा मोटर विकत घेणारे व्यापारी दाखवले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, राधानगरी पोलीस ठाणेत देखील आम्हाला कोण आरोपी आहेत हे दाखवले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी कोण आहेत हे आजअखेर मला माहित नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मला पोलीसांनी आरोपी कोण आहेत हे सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे दुसरा काय जबाब दिला हे मला

माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी मी जबाब पोलीस पेपर पाहिल्यानंतर दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी सरतपासात खोटा मजकूर नमूद केला आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

राधानगरी

दिनांक : २८/०४/२०२६

सही/-

**(एन. पी. काकडे)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्यायालय क्र. २), राधानगरी